PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Hi Poragi Konachi
Year: 2006

Song: Tujhi Najuk Barik Kambar
Lyricist: Mangesh Kulkarni

तुझी नाजूक बारीक कंबर पाहून
जीव धपाधप हलतो
तुझं रूप सावळं सुंदर पाहून
तोल सारखा ढळतो
तुझी नाजूक बारीक कंबर पाहून
जीव धपाधप हलतो
तुझं रूप सावळं सुंदर पाहून
तोल सारखा ढळतो
अरे काश्मीरची कळी जणू मी
अरे काश्मीरची कळी जणू मी
लाखो तुजवाणी मरती
आस पास फिरकूस नको
जाणते तुला मी पुरती
सपनात ये रे पटव मला रे
तुला हवे ते कर
हां मेला मेला
पुरता गेला बालब्रम्हचारी
हां मेला मेला
पुरता गेला बालब्रम्हचारी

या दुनियेमधी तुझ्यासारखी
गोडगोडुली नाही कुणी
या दुनियेमधी तुझ्यासारखी
गोडगोडुली नाही कुणी
नाही एकदा पुन्हा पुन्हा तुज
नकोच नाही म्हणेन मी

दया थोडीशी तुला येऊ दे
घट्ट एकदा बिलग जराशी
मठ्ठ चोंबडा असा कसा तू
करीशी उगा का मखलाशी
सपनात ये रे पटव मला रे
तुला हवे ते कर
हां मेला मेला
पुरता गेला बालब्रम्हचारी
हां मेला मेला
पुरता गेला बालब्रम्हचारी
हो मनोमनी या पुन्हा पुन्हा का
तुझी आठवण मज छळते
मनोमनी या पुन्हा पुन्हा का
तुझी आठवण मज छळते
मी ही जाणते गोड गुपित ते
माझे ही कधी मन चळते
फाटयावरती मारू जगाला
कौल मनाचा ऐक जरा
विचार कर ना जरा वयाचा
असा कसा तू निलाजरा
सपनात ये रे पटव मला रे
तुला हवे ते कर
हां मेला मेला
पुरता गेला बालब्रम्हचारी
हां मेला मेला
पुरता गेला बालब्रम्हचारी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*